**पिंपरी चिंचवड महानगरपालिका**
नागरवस्ती विकास योजना विभाग,
मुख्य प्रशासकीय इमारत - तळमजला, पिंपरी - ४११०१८.

**समाजसेवक व समुह संघटक या पदांवर मानधनावर हंगामी नेमणूकीबाबत**

**जाहिर प्रकटन**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रात, महनगरपालिकेच्या नागरवस्ती विकास योजना विभागामार्फत विविध कल्याणकारी योजना राबविल्या जातात. सदर योजनांचा वस्तीपातळीवर प्रचार व प्रसार करणे, तसेच योजनांसंदर्भातील इतर सर्व कामकाजाकरीता "समाजसेवक" या अभिनामाची ३ पदे व "समुह संघटक" या अभिनामाची ७ पदे सहा महिने कालावधीकरीता तात्पुरत्या स्वरूपात मानधनावर भरावयाची असून त्याकरीता आवश्यक शैक्षणिक अर्हता धारण करणा-या उमेदवारांकडून आरक्षण तक्त्यात नमूद केलेनुसार अर्ज मागविणेत येत आहेत.

| अ. क्र. | पदनाम | पद संख्या | दरमहा एकत्रीत मानधन | शैक्षणिक अर्हता | अनु. जाती | अनु. जमाती | भज (क) | इमाव | खुला | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | समाज सेवक | ३ | र.रु.२५,००० अधिक वाहतूक भत्ता र.रु.१,३०० | १) मान्यताप्राप्त विद्यापीठाकडील पदवी २) मान्यताप्राप्त विद्यापीठाकडील समाजकार्य विषयातील पदव्युत्तर पदवी परिक्षा (MSW) प्रथम श्रेणीत उत्तीर्ण, आणि MS Office/MSCIT परीक्षा उत्तीर्ण. | ०१ | ० | ० | ० | ०२ | **०३** |
| २ | समुह संघटक | ७ | र.रु.१५,००० अधिक वाहतूक भत्ता र.रु.१,३०० | १) मान्यताप्राप्त विद्यापीठाकडील पदवी २) मान्यताप्राप्त विद्यापीठाकडील समाजकार्य विषयातील पदव्युत्तर पदवी परिक्षा (MSW) उत्तीर्ण आणि MS Office/MSCIT परीक्षा उत्तीर्ण. | ०० | ०१ | ०१ | ०२ | ०३ | **०७** |

**अटी व शर्ती :-**

१) मानधनावरील नेमणूका पूर्णपणे तात्पुरत्या (हंगामी) स्वरूपाच्या आहेत. त्यामुळे अर्जदारास कोणत्याही प्रसंगी कायम नेमणूकीचा हक्क प्राप्त होणार नाही.
२) ज्या दिवशी महानगरपालिकेस सदर पदाची आवश्यकता नसेल, त्यावेळी कोणत्याही नोटीशीशिवाय त्यांची मानधनावरील सेवा संपुष्टात आणण्यात येईल.
३) उपरोक्त नमूद दोन्ही पदांसाठी विहीत नमुन्यातील अर्जाचा नमुना महानगरपालिकेच्या www.pcmcindia.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करणेत आलेला आहे.
४) अर्जासोबत अलिकडे काढलेले स्वत:चे दोन रंगीत फोटो, शैक्षणिक अर्हता प्रमाणपत्रांच्या सत्यप्रती तसेच लिफाफ्यावर समाजसेवक अथवा समुहसंघटक पदासाठी अर्ज असे स्पष्टपणे नमूद करावे.
५) मुलाखतीस येणे - जाणेकरीता उमेदवारास कोणत्याही प्रकारचा प्रवासभत्ता दिला जाणार नाही.
६) उपरोक्त पदांना मासिक हजेरीनुसार मानधन अदा केले जाईल.
७) उमेदवारास संगणकावर प्रत्यक्ष कामकाज करणे बंधनकारक राहील.
८) आवश्यकतेनुसार प्रतीक्षा यादी तयार करणेत येईल व सदर यादीचा कालावधी ३ महिने राहील.
९) पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्रामध्ये वास्तव्य असणा-या उमेदवारांस प्राधान्य दिले जाईल.

१०) वर नमूद केलेल्या दोन्ही पदांच्या बाबतीत अर्ज करणेसाठी खुल्या वर्गासाठी वयोमर्यादा ३८ वर्षे इतकी असून मागासवर्गीय उमेदवारांचे बाबतीत सदर वयोमर्यादा ४३ वर्षे इतकी राहील.

११) नेमणूक झालेल्या उमेदवारास र. रू. १००/- च्या स्टँप पेपरवर स्वखर्चाने हमी पत्र देणे बंधनकारक राहील.

१२) नेमणूक झालेल्या उमेदवारास पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे कार्यक्षेत्रात / नेमून दिलेल्या ठिकाणी कामकाज करावे लागेल.

१३) उमेदवाराचा अर्ज छाननीमध्ये बाद झालेस नंतर कोणताही पत्रव्यहार केला जाणार नाही.

तरी इच्छुक उमेदवारांनी दि.०७/१०/२०१७ अखेरपर्यंत विहीत नमुन्यातील अर्ज मा. सहाय्यक आयुक्त, नागरवस्ती विकास योजना विभाग, मुख्य प्रशासकीय इमारत - तळमजला, पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी – ४११०१८ यांचे कार्यालयात आवश्यक त्या कागदपत्रांच्या सत्यप्रतींसह सादर करावेत. पात्र उमेदवारांना मुलाखतपत्रे त्यांचे अर्जात नमूद केलेल्या पत्त्यावर पाठविणेत येतील.

sd

**आयुक्त**

पिंपरी चिंचवड महानगरपालिका

पिंपरी – ४११०१८

जाहिरात क्र.८००/२०१७

क्र. नावियो/१/कावि/९२६/२०१७

दिनांक २७/९/२०१७

**sd**

**सहाय्यक आयुक्त**

नागरवस्ती विकास योजना विभाग

पिंपरी चिंचवड महानगरपालिका

पिंपरी – ४११०१८

# <u>अर्ज नमुना</u>

पासपोर्ट
आकाराचा
फोटो

प्रति,

मा. सहाय्यक आयुक्त
नागरवस्ती विकास योजना विभाग
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी – ४११०१८.

**विषय – मानधनावर तात्पुत्या स्वरूपात समाजसेवक / समुह संघटक या पदावर नेमणुकीबाबत**

**संदर्भ –** दिनांक / /२०१७ रोजीच्या------------------------------------ या वर्तमानपत्रामध्ये तसेच महानगरपालिकेच्या www.pcmcindia.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द झालेली जाहिरात क्र.८००/२०१७

महोदय,

संदर्भीय जाहिरातीनुसार मी मानधन पध्दतीने समाजसेवक / समुहसंघटक या पदासाठी आवश्यक ती शैक्षणिक अर्हता धारण करीत असून या पदासाठी निवड होण्याकरिता विहीत नमुन्यातील अर्ज सादर करीत आहे.

१. संपूर्ण नाव : ----------------------------------------------------------------------------------------

२. पत्रव्यवहाराचा पत्ता (पिनकोडसह) : ------------------------------------------------------------
----------------------------------------------------------------------------------------------------

३. मोबाईल नं. ----------------------------------------------------------------------------------------

४. जन्मतारीख : ------------------------- (DD/MM/YY) ५. लिंग : स्त्री / पुरूष

६. जात: ----------------------------------- (सोबत प्रमाणपत्राची सत्यप्रत जोडणे आवश्यक)

७. अर्जदाराने धारण केलेल्या शैक्षणिक अर्हतेचा तपशील : (सोबत सत्यप्रती जोडणे आवश्यक)

| अ.क्र | शैक्षणिक अर्हता | उत्तीर्ण वर्ष | एकूण प्राप्त गुण | टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |

८. अनुभवाचा तपशील : -------------------------------------------------------------------------------------
(सोबत सत्यप्रती जोडणे आवश्यक)

वर नमूद केलेला तपशील खरा व बरोबर असून त्याबाबत आवश्यक प्रमाणपत्राच्या सत्यप्रती सोबत जोडत आहे. मी असे ही प्रमाणित करतो/करते की, वर दिलेली माहिती खोटी अगर चुकीची आढळून आल्यास या माहितीच्या आधारे मानधनावरील नियुक्ती रद्द होण्यास मी पात्र राहील. तसेच माझ्या विरूध्द महानगरपालिकेने कायदेशीर कारवाई केल्यास माझी कोणतीही तक्रार राहणार नाही.

ठिकाण :

दिनांक : / /२०१७

अर्जदाराची स्वाक्षरी

सहपत्रे – १)
२)
३)